# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

माहितीचा अधिकार

---

**क्रमांक-तक्रार-११४/२०२५** **दिनांक :- ०१ जाने., २०२६**

१. श्री. अशोक यशवंतराव तुमराम,
रा. मोहबाळा पो. चरुर (खटी), ता. वरोरा, जि. चंद्रपूर -- **तक्रारदार**

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी,
तहसिल कार्यालय वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर --**जन माहिती अधिकारी**

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर -- **प्रथम अपिलीय अधिकारी**

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार आयोगास दिनांक १७.०३.२०२५ रोजी (प्राप्त दि. १८.०३.२०२५) थेट तक्रार अर्ज सादर केला आहे. या तक्रार अर्जा मध्ये तक्रारदार यांनी "प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी द्वारा माहिती न देता, माहिती नाकारण्यात आली. जन माहिती अधिकारी द्वारा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाची अवमानना आणि माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन आणि अवमाननाबाबत" असे कारण नमूद करुन थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९ (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथस्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यक्ती व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(६) अन्वये पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करुन, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९(३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णया विरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), यामध्ये सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२.१२.२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये — The nature of the power under Section १८ is supervisory in character whereas the procedure under Section १९ is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in

receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the stature, namely, by following the procedure under Section १९. This Court is, therefore, of the opinion that Section ७ read with Section १९ provides a complete statutory mechanism to a person who is aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९(१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता आयोगास असे निदर्शनास आले आहे की, तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ६(१) अंतर्गत दिनांक ०७.१०.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी, मंडळ अधिकारी वरोरा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर केले. त्यानंतर तक्रारदार यांनी "जन माहिती अधिकारी द्वारा माहिती देण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय घेण्यात आला नाही" असे कारण नमुद करुन कलम १९ (१) अन्वये दिनांक १४.११.२०२४ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, तहसिलदार, वरोरा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०.१२.२०२४ रोजी सुनावणी घेवून " जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, वरोरा यांनी सादर केलेल्या अभिलेखानुसार अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, वरोरा यांनी यापुर्वी पुरविण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, वरोरा यांनी सहायक जन माहिती अधिकारी तथा तलाठी, खांजी यांच्याकडून जोडपत्र-अ मध्ये नमूद केलेली माहिती प्राप्त करुन अपिलार्थी यांना ३० दिवसाचे आत निशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांची अपील मान्य करण्यात येत आहे. प्रस्तूत प्रथम अपील अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे." असे नमुद करुन आदेश पारीत केले. तद्नंतर तक्रारदार यांनी "प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी द्वारा माहिती न देता, माहिती नाकारण्यात आली. जन माहिती अधिकारी द्वारा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाची अवमानना आणि माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन आणि अवमाननाबाबत" असे कारण नमूद करुन आयोगाकडे कलम १८ (१) अन्वये थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, त्यांनी कलम १९ (३) नुसार आयोगाकडे व्दितीय अपिल केलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी कलम १९ (३) अंतर्गत उपलब्ध असलेल्या संपूर्ण वैधानिक कार्यप्रणालीचा अवलंब न करता कलम १८ चा वापर केला आहे.

तक्रारदार यांची कलम १९(३) अंतर्गत कार्यप्रणालीचा अवलंब न करता अशा पध्दतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसंगत ठरते.

तथापि, तक्रारकर्ता यांच्या दिनांक १७.०३.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, तहसिल कार्यालय वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय वरोरा यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र. ११४/२०२५/तक्रार शाखा/२०८८, दिनांक ०६.०५.२०२५ अन्वये तक्रारदार यांच्या दिनांक ०७.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात व दि. १४.११.२०२४ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर यांनी दिनांक २३.०५.२०२५ च्या पत्रान्वये (प्राप्त दिनांक २९.०५.२०२५) आयोगास अहवाल सादर करुन त्यामध्ये, "(१) माहिती अर्ज दिनांक ०७.१०.२०२४ सदरहू माहिती अर्ज दि. ११.१२.२०२४ रोजी प्राप्त झाला. त्यानुसार सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा तलाठी खांजी यांना दि. १६.१२.२०२४ चे पत्रानुसार माहिती

मागविण्यात आली. त्यानुसार दि. ०६.०१.२०२५ रोजी प्राप्त माहिती नुसार तक्रारदार यांना दि. ०६.०१.२०२५ रोजी नोंदणीकृत डाकेने माहिती पाठविण्यात आली. सदरहू माहिती ३० दिवसाचे आत पुरविण्यात आली. (२) प्रथम अपील अर्ज दि. १४.११.२०२४ प्रथम अपील अर्ज निकालपत्र पारीत दि. १७.१०.२०२४ प्राप्त दि. ०१.०१.२०२५ रोजी झाले. त्यानुसार सहायक जन माहिती अधिकारी तथा लाठी खांजी यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कलम ४(१)(ब) अन्वये ठेवावयाची १७ मुद्दे माहिती नागरिकांची सनद व कार्यालयातील अर्ज प्रक्रिया कालावधी माहिती स्वयंप्रेरणेने तयार करुन या कार्यालयास सादर करण्याविषयी दिनांक ०२.०१.२०२५ चे पत्रानुसार कळविण्यात आले. सहायक जन माहिती अधिकारी तथा तलाठी खांजी यांचेकडून प्राप्त १७ मुद्दयांची माहिती दि. २१.०१.२०२५ रोजी नोंदणीकृत डाकेने तक्रारदार यांना पुरविण्यात आली व मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार वरोरा यांचे आदेशाचे पालन करण्यात आले" असे नमुद केले आहे.

सबब, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जानुसार तक्रारकर्ता यांना माहिती पुरविली असल्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन केले असल्याने सदर प्रकरणी पुढील कोणतीही कार्यवाही अपेक्षित नसल्याने कलम १८ अंतर्गत केलेली थेट तक्रार निकाली काढणे आवश्यक ठरते. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: ०१.०१.२०२६

जा.क्र. 218 दि. 08 JAN 2026